स्थायी समितीच्या शुक्रवार दिनांक 27–07–2012 रोजी दुपारी 12–30 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. तिवारी दयाशंकर चंन्द्रशेखर | अध्यक्ष |
| 2. | सौ. कानतोडे भाग्यश्री गणेश | सदस्या |
| 3. | सौ. वानखेडे अनीता प्रदिप | सदस्या |
| 4. | श्री. सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 5. | सौ. बहादुरे सरोज राजु | सदस्या |
| 6. | श्री. फुके परिणय रमेश | सदस्य |
| 7. | श्री. खान असलमखां रशीद खान | सदस्य |
| 8. | श्री. डोळस रविंद्र गोविंदराव | सदस्य |
| 9. | श्री. राजू ज्योतीरामजी लोखंडे | सदस्य |
| 10. | सौ. सुजाता विठ्ठलराव कोंबाडे | सदस्या |
| 11. | श्री. हजारे पुरूषोत्तम नागोराव | सदस्य |
| 12. | श्री. गुडधे प्रफुल्ल विनोदराव | सदस्य |
| 13. | सौ.जैसवाल हर्षला संजय | सदस्या |
| 14. | सौ. प्रगती अजय पाटील | सदस्या |
| 15. | सौ.अलका अजय दलाल | सदस्या |

अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. थूल राजू वासुदेवराव | सदस्य |

उपस्थित अधिकारी

1) श्री. रविन्द्र कुंभारे, अति. उप निगम आयुक्त

2) श्री. रविंद्र पागे, निगम सचिव

ठराव क्रमांक 86 :– स्थायी समिती ठराव क्र. 43, दि. 28.05.2012 अन्वये नविन दर करार करण्याकरीता नविन ई–निविदा बोलविण्यास्तव निविदेचा मसुदा स्थायी समिती समोर ठेवण्याकरीता सादर केलेला समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषयात जास्तीत जास्त स्पर्धक निविदेमध्ये सहभागी होण्याची संधी निर्माण व्हावी जेणे करुन म.न.पा.ची या स्पर्धेतून आर्थीक बचत होईल असे स्थायी समितीस वाटते म्हणून विभागाने सुचविलेल्या सिंगल वर्क ऑर्डरची, किमान राशी व टर्न ओव्हरची किमान राशी प्रस्तावित केलेल्या राशीपेक्षा 50 प्रतिशत कमी करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 87 :– जय भोला गणेश चौक, अशोका हॉटेल जंक्शन–माऊन्ट रोड,गिट्टीखदान चौक, सुभाष नगर टी पाईन्ट,अभ्यंकर नगर चौक, सी.के.नायडु चौक, कल्पना बिल्डींग टी पाईंन्ट, कमाल टॉकीज चौक, कॉंग्रेस नगर टी पाईन्ट आणि गंगाबाई घाट चौक वर वाहतुक सिग्नलची पुर्नरचना ( Renovation-LED base with Battery Back up & Timer इत्यादी सह ) करण्या करीता रुपये 44,25,000/– च्या प्राकलनास तसेच हे काम मॅन्युफॅक्चर्स कडून ई–निविदा बोलावुन करण्याकरिता प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन मॅन्युफॅक्चर्स व डिलर या दुरुस्तीचा अंतर्भावासह एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 88 :– वाहतुक पोलीस दक्षिण शाखा अंतर्गत – रहाटे कॉलनी चौक जवळील पार्कींग लॉटस (रस्त्याच्या पश्चिम बाजु )

1) पार्कींग लॉटस च्या डावे बाजू – ऑटो पार्कींग करीता आरक्षीत (लांबी 32 मीटर)
2) पार्कींग लॉटस – दोन/चार चाकी वाहन करीता (लांबी 128 मीटर)
3) पार्कींग लॉटस च्या उजवे बाजू – हॉकर्स झोन करीता आरक्षीत (उर्वरीत लांबी)

करीता '' पे ॲन्ड पार्क '' योजना राबविण्याकरिता प्राप्त "मे. द स्पून कॅफे ॲण्ड गार्डन रेस्टॉरेन्ट" (प्रो. श्री. मिलींद माणिकराव साबळे) यांची रुपये 2,25,000/– प्रति वर्ष ची एकमेव ई– निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 89 :– नेहरुनगर झोन क्र.5 येथील जगनाडे चौक ते के.डी.के. रस्त्यामधून जाणाऱ्या नाल्यावर बॉक्स कल्व्हेट चे बांधकाम रु.28,34,396/– रकमेच्या सुधारित प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे तसेच कंत्राटदार मे. एस.आर.एंटरप्राईजेस, यांना त्यांचे मंजूर दरावर उर्वरित रु.4,54,518/– कामाचा कार्यादेश निर्गमित करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 90 :– वार्ड क्र. 04, संत कबिर म.न.पा. हिंदी प्राथमिक शाळा इमारतीचे सर्व शिक्षा अभियानातंर्गत बांधकामास्तव मे. सोम कंस्ट्रक्शन, यांची प्राकलनीय दरांपेक्षा 7.86 टक्के अधिक दराची म्हणजेच रु. 37,96,379/– रक्कमेची निविदा स्विकृतीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 91 :– वार्ड क्र. 33, मिनीमातानगर हिंदी माध्यमिक शाळा येथे सर्व शिक्षा अभियानातंर्गत 19 वर्गखोल्यांचे बांधकामास्तव प्राप्त 2 अर्हताप्राप्त निविदांपैकी, निम्नतम निविदाकार मे. फोनिक्स इंजिनिअरींग, यांची प्राकलनीय दरांपेक्षा 9.95 टक्के अधिक दराची म्हणजेच रु. 68,30,051/– रक्कमेची निविदा स्विकृतीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 92 :– गड्डीगोदाम चौक, इंदोरा चौक, दोसर भवन चौक,गीतांजली चौक, सेवासदन चौक, सोना रेस्टारेंन्ट चौक, चंद्रशेखर आझाद चौक, वर्धमान चौक, मेश्राम टी पाईन्ट, आणि छावणी टी पॉईन्ट वर वाहतुक सिग्नलची पुर्नरचना ( Renovation-LED base with Battery Back up & Timer इत्यादी सह ) करण्या करीता रुपये 44,60,000/– च्या प्राकलनास तसेच हे काम मॅन्युफॅक्चर्स कडून ई–निविदा बोलावुन करण्याकरिता प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन मॅन्युफॅक्चर्स व डिलर्स या दुरुस्तीचा अंतर्भावसह एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 93 :– नागपूर महानगरपालिका, नागपूर सिव्हील लाईन्स येथील मुख्य कार्यालयाच्या आवारात प्रशासकीय इमारत बांधकामाच्या प्राकलनास रु.17,99,45,258/– मंजुरी स्थायी समिती ठराव क्र. 135 दिनांक 10.01.2003 अन्वये मिळाली आहे. यास मंजूर ठरावानुसार प्रकल्पाचे ''वास्तुशिल्पकार'' म्हणून श्री. विरेंद्र खरे यांना म.न.पा.च्या विहीत अटी व शर्तीवर पॅनलवर नियुक्त व 3 टक्के सेवा शुल्क दरावर मंजूरी प्राप्त आहे. यामध्ये इमारत बांधकाम व संलग्न विद्युत कामे, अंतर्गत साज सजावट, जुन्या इमारतीचे नुतनीकरण, जुनी इमारत तोडणे, आतील रस्त्यांचे बांधकाम, परिसरातील रस्त्यांचे बांधकाम, लॅण्डस्केपिंग व परिसर विकास या कामांचा वाव होता.

सदर नविन प्रशासकीय इमारतीच्या कामाचा वाव वाढवून रु.38,81,27,900/–चे सुधारित प्राकलनास मा. स्थायी समिती ठराव क्र. 209 दि. 28.02.2005 अन्वये मंजुरी प्राप्त आहे या करिता आर्किटेक्ट Shri Verandra Khare यांचे कडून मंजुर ठराव क्र. 135 अन्वये 3 टक्के सेवा शुल्क दरावर सेवा घेण्यात आलेली आहे.

त्याचप्रमाणे मा. आयुक्त, यांचे सुचनेप्रमाणे नविन प्रशासकीय इमारतीत सुरक्षिततेच्या दृष्टीने आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने Building Management System, Air Cooling etc. नियोजन करण्यात आले. या करिता मुख्यतः Electric Work, Fire Fighting system, B.M.S. व त्यांचेशी निगडीत सिव्हील कामे यामध्ये वाढ होऊन सुधारीत प्राकलन रुपये 56,34,15,055/– ला मा. स्थायी समिती ठराव क्र.674 दि. 24.02.2009 अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. या कामाकरिता ठराव क्र. 135 दिनांक 10.01.2003 नुसार नियुक्त करण्यात आलेले आर्किटेक्ट श्री. विरेंद्र खरे यांचे कडून तयार करण्यात आलेल्या रु.56,34,15,055/– रकमेच्या सुधारित प्राकलनावर सेवा घेणे सुरु आहे.

नविन प्रशासकीय इमारतीच्य बांधकाम कामाचे मूळ प्राकलन राशी 17,99,45,258/–मध्ये वाढ होवून सुधारीत प्राकलन रुपये 56,34,15,055/– यास मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे. या प्रकल्पातील बाबी वाढल्यामुळे व ही सर्व कामे वास्तुशिल्पकार यांच्या मुळ मंजूर प्राकलनात वाव असल्याने या कामाचे मुळचे मंजुरीप्राप्त वास्तुशिल्पकार श्री. विरेंद्र खरे यांना वाढीव प्राकलन राशीस रु.56,34,15,055/– वर मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

त्याचप्रमाणे श्री.विरेंद्र खरे, वास्तुशिल्पकार यांना या आधीच्य मंजुर 3 टक्के सेवा शुल्क अदा करण्यासाठी व सेवा घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषय कार्यालयास परत करण्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 94 :– नागपूर महानगरपालिकेचे विविध विभाग व झोनल कार्यालया मध्ये असलेली मालमत्ता व इमारतीची देखरेख व सुरक्षा करण्याकरीता सन 2012–13 व 2013–14 असे पुढील दोन वर्षाच्या कालावधी करीता शासनाचे किमान वेतन व इतर लागू असलेले भत्ते मिळून, खाजगी सुरक्षा एजेंसी कडून स्थायी समिती ठराव क्र. 44 दिं. 28.05.2012 अन्वये नविन ई–निविदा बोलविण्यात आलेले होते. त्या अनुषंगाने एकुण सहा ई–निविदा खालील प्रमाणे प्राप्त झालेले आहेत.

1) मे. युनिटी सिक्युरिटी फोर्स नागपूर,

2) मे. किशोर एजेन्सी, नागपूर

3) मे.सुपर सिक्युरिटी सर्व्हिसेस नागपुर

4) मे. सिंग इंटीलिजेन्स सिक्युरिटी प्रा.लि.मुबंई

5) मे. वनश्री इंटीलिजेन्स सिक्युरिटी सर्व्हिसेस,नागपूर

6) मे. ब्रिस्क फसीलिटी प्राय लि.पुणे

वरील एकुण सहा निविदाधारकांर पैकी मे. ब्रिस्क फसीलिटी प्राय.लि.पुणे यानी निविदाच्या अटी व शर्ती प्रमाणे आवश्यक कागद पत्रे सादर न केल्यामुळे त्यांची निविदा दर (प्राईस बिड ) उघडण्यात आलेली नाही तसेच उर्वरीत खालील एकुण पाच निविदाधारकानी निविदाच्या अटी व शर्ती प्रमाणे आवश्यक कागद पत्रे सादर केल्यामुळे त्यांची निविदा दर (प्राईस बिड ) दिनांक 06.07.2012 ला उघडण्यात आली.

1) मे. युनिटी सिक्युरिटी फोर्स नागपूर,

2) मे. किशोर एजेन्सी, नागपूर

3) मे.सुपर सिक्युरिटी सर्व्हिसेस नागपुर

4) मे. सिंग इंटीलिजेन्स सिक्युरिटी प्रा.लि.मुबंई

5) मे. वनश्री इंटीलिजेन्स सिक्युरिटी सर्व्हिसेस,नागपूर

वरील एकुण पाच सुरक्षा एजेन्सीने किमान वेतन व शासकीय सर्व अंशदान मिळून तसेच प्रशाकिय सेवा शुल्क सहीत खालील प्रमाणे समान दर सादर केलेले आहेत.

अ ) प्रती बंदुकधारी सुरक्षा गार्ड रू. 11907=74 प्रती महिना

ब) प्रती बिना– बंदुकधारी सुरक्षा गार्ड रू. 11187=64 प्रती महिना

क) प्रती बहुउद्देशिय सुरक्षा गार्ड रू. 11187=64 प्रती महिना

वरील एकुण पाच सुरक्षा ऐजन्सीचे निविदा मंजुर करून ई-निविदा द्वारा प्राप्त झालेले किमान वेतन व शासकीय सर्व अंशदान मिळून तसेच प्रशाकिय सेवा शुल्क सहीत च्या दरा प्रमाणे एकुण 43 बंदुकधारी सुरक्षा गार्ड, 531 बिना– बंदुकधारी सुरक्षा गार्ड, व 51 बहुउद्देशिय सुरक्षा गार्ड म.न.पा.च्या विविध ठिकाणी लावण्याकरीता व त्या करीता होणा–या खर्चास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 95 :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

हस्ता /– हरीष दुबे

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

हस्ता /– दयाशंकर तिवारी

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर